महाराष्ट्र शासन

ई-मेल-doe10.rfd@maharashtra.gov.in
दुरध्वनी क्रमांक (०२२) २२७९३७५४

क्र. बदली-२०१७/प्र.क्र.२५७/ई-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय (मुख्य इमारत), १ ला मजला,
मादाम कामा मार्ग, महात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०९ मे, २०१८.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,

विषय :- महसूल विभागातील क्षेत्रिय कार्यालयातील गट-क, तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या विनंतीवरुन आंतर विभागीय बदली / आंतर जिल्हा बदलीबाबत.

महोदय,

वरील विषयाबाबत संबंधित सर्व जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ०३.०६.२०११ मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने खालील **विवरणपत्र-अ** येथे नमूद तलाठी तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने विशेष प्रकरणी अपवादात्मक परिस्थितीत ५ वर्षे सेवा कालावधीची अट शिथिल करुन खालील **विवरणपत्र-ब** येथे नमूद तलाठी कर्मचाऱ्यांच्या त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जिल्ह्यांत बदली करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

<u>विवरणपत्र-अ</u>

अ.क्र.	नांव	कोठून	कोठे
१	श्री धर्मपाल भिमराव वानखेडे, तलाठी	नंदुरबार	अमरावती
२	श्री अजय नारायण देशमुख, तलाठी	नागपूर	अमरावती (श्री.शरद हराळकर यांच्या बदलीने रिक्त झालेल्या जागेवर)
३	श्री प्रकाश रमाकांत महाडेश्वर, तलाठी	रत्नागिरी	कोल्हापुर
४	श्री प्रकाश मधुकर कडाळे, तलाठी	कोल्हापूर	नाशिक (श्री. प्रविण सोयाम यांच्या बदलीने रिक्त झालेल्या जागेवर)
५	श्री किशोर संजयकुमार घोळवे, तलाठी	रत्नागिरी	नाशिक
६	श्री माधव शेषेराव मेतलवाड, तलाठी	नाशिक	नांदेड
७	श्री. ईश्वरलाल रमेश कोळी, तलाठी	पुणे	जळगांव
८	श्री. ज्ञानेश्वर भाऊराव चव्हाण, तलाठी	वर्धा	यवतमाळ
९	श्री.राम पुंडलिक मुंडे, तलाठी	सिंधुदुर्ग	नांदेड
१०	श्री. प्रविण शहाजी माने, तलाठी	रत्नागिरी	मुबई- उपनगर
११	श्री. पांडूरंग गणपती बुरुड, तलाठी	सिंधुदुर्ग	कोल्हापूर
१२	श्री. प्रल्हाद व्यंकटराव पल्ले, तलाठी	अमरावती	लातूर

अ.क्र.	नांव	कोठून	कोठे
१३	श्रीमती नयना अमृत सिंगनाथ, तलाठी.	पालघर	नाशिक
१४	श्री. सुनिल जगन्नाथ तपासे, तलाठी.	सातारा	ठाणे
१५	श्री. वैजनाथ श्रीधरराव चव्हाण, तलाठी	रत्नागिरी	लातूर
१६	श्री.संजय आनंदा वानोळे, तलाठी.	सोलापूर	नांदेड
१७	श्रीमती सविता बाबाराव मुसळे, तलाठी.	हिंगोली	वाशिम
१८	श्री विवेक सुरेशराव बाबरे, तलाठी	गोंदिया	यवतमाळ
१९	कु.मिनल देवरावजी तिखे, तलाठी	यवतमाळ	अमरावती (श्रीमती स्मिता शिरभाते यांच्या बदलीने रिक्त झालेल्या जागेवर)
२०	श्री अरुण लक्ष्मण आळवे, तलाठी	जळगांव	बुलडाणा
२१	श्रीमती मयुरा मुकुंद परांजपे, तलाठी.	सिंधुदर्ग	रत्नागिरी
२२	श्री. किरण ज्ञानेश्वर कदम, तलाठी.	पालघर	ठाणे

विवरणपत्र- ब

अ.क्र.	कर्मचाऱ्यांचे नांव, पदनाम	कोठून	कोठे
१	श्रीमती शितल श्रीकृष्ण पळसपगार, तलाठी	औरंगाबाद	अमरावती
२	श्री रामचंद्र दत्तात्रय जगताप, तलाठी	लातुर	पुणे
३	श्री अनिल जयसिंग दिंडे, तलाठी	सिंधुदर्ग	सातारा
४	श्री दिनेश प्रल्हाद साळुंखे, तलाठी	रायगड	सोलापूर
५	श्री सतिशबाबु काशिनाथराव देशमुख, तलाठी	बीड	नांदेड
६	श्री मुकिंद पांडुरंग सुडके, तलाठी	अमरावती	लातुर
७	श्री शरद राम दुधभाते, तलाठी	सांगली	उस्मानाबाद
८	श्रीमती भुमिका भारत लदगे, तलाठी	सोलापूर	रायगड
९	श्री.चंद्रकिरण रायभान साळवे, तलाठी	धुळे	ठाणे
१०	श्री. केतेश्वर माधव कोंडलवाड, तलाठी	सोलापूर	नांदेड
११	श्रीमती कविता भगवान गांगुर्डे, तलाठी.	औरंगाबाद	नाशिक
१२	श्री. निवास बाबुसिंग जाधव, तलाठी.	नाशिक	जालना
१३	श्रीमती दिप्ती परशुराम जाधव, तलाठी.	पालघर	ठाणे
१४	श्री. गजानन सोपान टेकाळे, तलाठी	अहमदनगर	बुलढाणा
१५	श्री अशोक रामकिसन काशीद, तलाठी	जालना	औरंगाबाद
१६	श्रीमती अर्चना अरुणराव टेकाडे, तलाठी	परभणी	अमरावती
१७	श्री.पवन सायलू ठकरोड, तलाठी.	सोलापुर	नांदेड
१८	श्री. विशाल सदाशिव पाटील, तलाठी	सिंधुदर्ग	कोल्हापूर
१९	श्री. दिलीप त्र्यंबकराव हरणे, तलाठी.	यवतमाळ	अमरावती
२०	श्रीमती मिनल नामदेव खांदे, तलाठी	बुलडाणा	बीड

अ.क्र.	कर्मचाऱ्यांचे नांव, पदनाम	कोठून	कोठे
२१	श्री अमोल शामराव चव्हाण, तलाठी	नांदेड	नागपूर
२२	श्री.प्रकाश आनंदा तायवाडे, तलाठी.	कोल्हापूर	नांदेड
२३	श्री.प्रविण संपत गरुड, तलाठी.	परभणी	पूणे
२४	श्रीमती स्वाती सुधीर बुटे, तलाठी	अमरावती	अकोला
२५	श्री सागर जगन्नाथ भोसले, तलाठी	कोल्हापूर	सांगली
२६	श्री. सिध्दार्थ यशवंत धाबे, तलाठी	नांदेड	वाशिम (श्री. बाबासाहेब कांबळे यांच्या बदलीने रिक्त झालेल्या जागेवर)
२८ आपसी	अ) श्री. संतोष महादू जोशी, तलाठी.	नाशिक	पुणे
	ब) श्री. पंडीत पोपट वाघमारे, तलाठी.	पुणे	नाशिक

२. तरी प्रस्तुत प्रकरणी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१०/ प्र.क्र.२१०/ १०/ १२, दि.०३.०६.२०११ मधील खालील तरतुदींची पुन्हा खातरजमा करुन पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा, ही विनंती :-

१) विनंतीवरून, संवर्गबाह्य बदली केवळ त्याच पदावर अथवा समकक्ष पदावर करता येईल. अपवादात्मक परिस्थितीत कनिष्ठ (वेतनश्रेणी) वेतनबँड व ग्रेड पे मधील पदावर बदली करता येईल. मात्र, ज्या पदांकरीता विशिष्ट तांत्रिक वा अन्य अर्हता विहित केली असेल व स्वतंत्र निवड प्रक्रिया अवलंबण्यात येत असेल अशा संवर्गबाह्य पदावर बदली अनुज्ञेय होणार नाही.

२) संबंधित कर्मचाऱ्यांची नियुक्ती नियमित असावी व त्याला / तिला स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात आले असावे.

३) संबंधित कर्मचाऱ्याची किमान ५ वर्षे सेवा पूर्ण झालेली असावी. अपवादात्मक परिस्थितीत हा कालावधी २ वर्षे इतका शिथिल करता येईल म्हणजेच किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झाली असल्यास अपावादात्मक परिस्थितीत विनंती विचारात घेता येईल.

४) विनंतीवरून, संवर्गबाह्य बदली जिल्हास्तरावर बदलीपात्र पदधाराकांच्या बाबतीत केवळ अन्य जिल्ह्यातील संबंधित विभागप्रमुखांच्या अधिपत्याखालील कार्यालयात अथवा अन्य विभागप्रमुखांच्या अधिपत्याखालील कार्यालयात करता येईल आणि महसूली विभागस्तरावर बदलीपात्र पदधारकांच्या बाबतीत अन्य महसूली विभागातील संबंधित विभागप्रमुखांच्या अधिपत्याखालील कार्यालयात अथवा अन्य विभागप्रमुखांच्या अधिपत्याखालील कार्यालयात करता येईल.

५) प्रशासनाचे हित, सार्वजनिक सेवेचे हित विचारात घेऊन बदली करता येईल. संबंधित कर्मचारी ज्या कार्यालयात कार्यरत असेल त्या कार्यालयाच्या विभागप्रमुखांनी तसेच ज्या कार्यालयात बदलीबाबत विनंती केली आहे त्या विभागप्रमुखांनी बदलीसंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.

६) ज्या पदावर बदलीबाबत विनंती केली आहे ते पद निर्बाध रिक्त असणे आवश्यक राहील. तसेच संबंधित कर्मचाऱ्यांने समान पदावर बदलीबाबत विनंती केली असल्यास त्याची ज्या मार्गाने (उदा. पदोन्नती, नामनिर्देशन) नियुक्ती झाली आहे त्या कोट्यातील पद उपलब्ध असणे आवश्यक राहील. मात्र कर्मचाऱ्यांने अन्य समकक्ष अथवा निम्न पदावर बदलीबाबत विनंती केली असल्यास सरळसेवा

कोट्यातील पद उपलब्ध असणे आवश्यक राहील. तसेच संबंधित कर्मचारी ज्या प्रवर्गातील आहे (उदा. खुला प्रवर्ग, अ.जा.,इ.) त्या प्रवर्गाचे पद उपलब्ध असणे आवश्यक राहील.

७) ज्या पदावर बदलीबाबत विनंती केली आहे त्या पदावर सेवाप्रवेश नियमातील तरतुदी तसेच त्या पदास विहित केलेल्या परीक्षा व अन्य बाबींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

८) संबंधित कर्मचाऱ्याची बदलीनंतर त्या पदावरील ज्येष्ठता रुजू झालेल्या दिनांकास निश्चित होईल. तसेच पुर्वीच्या सेवेचा लाभ वेतननिश्चिती, रजा, निवृत्तीवेतन याकरीता वित्त विभागाच्या संबंधित नियमातील तरतुदीनुसार अनुज्ञेय होईल.

९) या बदलीच्या अनुषंगाने, पदग्रहण अवधी, बदली अनुदान, प्रवास भत्ता व तद्नुषंगिक लाभ अनुज्ञेय होणार नाहीत.

१०) लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदावर बदलीसंदर्भात लोकसेवा आयोगाची मान्यता आवश्यक राहील.

११) वरीलप्रमाणे विहित केलेल्या सर्व अटी मान्य असल्याचे संबंधित कर्मचाऱ्यांकडून लेखी स्वरूपात (बंधपत्र) घेणे आवश्यक राहील.

संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी बदलीमान्य कर्मचाऱ्यांची उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे बंधपत्र प्राप्त करुन घ्यावे व तद्नंतरच त्यांना कार्यमुक्त करावे.

३. सदर शासन पत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेताक २०१८०५०९१९२२१४८३१९ असा आहे. हे शासन पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

आपला,

Santosh Haridasrao Bhogle

Digitally signed by Santosh Haridasrao Bhogle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cfe36679ae12922422bc5e7f7d277841f1fe67725f465c272fd6727259260b3d, cn=Santosh Haridasrao Bhogle
Date: 2018.05.09 19:59:00 +05'30'

(डॉ. संतोष भोगले)
उप सचिव

प्रत,

विभागीय आयुक्त, नाशिक / पुणे / अमरावती / नागपूर / औरंगाबाद/कोकण.